# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

**आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त**


जाक्रं विकाऔ/शिक्षण/2010/ ५०e१

दिनांक :- 23 JUL 2010

प्रति,

प्राचार्य,

विना-अनुदानित अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र

पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था

एमबीए एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती (ईबीसी) उपयोगिता प्रमाणपत्र.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रं. जाक्रं विकाऔ/शिक्षण/2010/379 दिनांक 5.11.2010.

उपरोक्त संदर्भित पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,या कार्यालयाने उपरोक्त संदर्भित पत्रानुसार शैक्षणिक वर्ष 2009-10 शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती (ईबीसी) बाबत मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. बहूतेक संस्थांना प्रतिपूर्तीचे धनादेश प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापी संस्थेकडून अदयाप प्रदानाची कार्यवाही बाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करण्यात आलेले नाही. उपरोक्त संदर्भित पत्रातील मुददा क्रं. 12 नुसार उपयोगिता प्रमाणपत्राबाबतची कार्यवाहीचे निर्देश देण्यात आलेले आहेत. धनादेश प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांचे आत प्रदानाची कार्यवाही करुन हे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याचे कळविण्यात आले असुनही कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कांही विदयार्थ्यांकडून शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती मिळाली नसल्याच्या तक्रारी या कार्यालयास येत आहेत. ही वित्तीय अनियमितता असून संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की,विदयार्थ्यांना प्रतिपूर्तीची रक्कम 15 दिवसांत प्रदान केलेली नसेल तर शासन निर्णयानूसार प्रति दिवस 1 टक्का या प्रमाणे दंडाची रक्कम परिगणित करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.व तात्काळ उपयोगिता प्रमाणपत्र विदयार्थ्यांच्या प्रदानाच्या तपशिलानुसार सादर करावी.

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद

प्रत : ०१. या कार्यालयाचे प्रोगॅमर यांना माहितीस्तव व **शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती उपयोगिता प्रमाणपत्र** या शिर्षाखाली कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.